# हैं तय्यार हम...


Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
17 Dec 2017
Associate Sponsor riso Ricebran Oil
Powered by DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon



## फिटनेसबाबत जागृती करणारा उपक्रम

आजच्या धकाधकीच्या काळात सर्व जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडण्यासाठी फिटनेस अत्यंत आवश्यक आहे. औरंगाबाद महामॅरेथॉन या उपक्रमाच्या माध्यमातून फिटनेसच्या नव्या व्याख्या तरुणांपुढे येतील आणि त्यांना त्याचे महत्त्व समजेल. एकंदरीतच सर्व शहरवासीयांमध्ये फिटनेस बाबत जागृती निर्माण करणारा हा अतिशय स्तुत्य उपक्रम आहे असे वाटते.

- सीताराम अग्रवाल
(चेअरमन, सारा ग्रुप)



## हम किसीसे कम नही -

'लोकमत'च्या वतीने १७ डिसेंबर रोजी होणाऱ्या औरंगाबाद महामॅरेथॉनमध्ये धावण्यास आम्ही अनेक ज्येष्ठ नागरिक सज्ज आहोत. या मॅरेथॉनदरम्यान तरुणांनाही लाजविणारा उत्साह आमच्यात पाहायला मिळेल. आम्ही मागच्या वर्षीही या उपक्रमात सहभागी झालो होतो. नवी प्रेरणा, नवा उत्साह निर्माण करणाऱ्या या महामॅरेथॉनच्या आयोजनाबद्दल आम्हा ज्येष्ठ नागरिकांतर्फे 'लोकमत'चे मनापासून कौतुक आणि धन्यवाद.

- कृष्णकांत चौधरी.



**सॅफ्रॉन ग्रुप...** (डावीकडून) नितीन चुडीवाल, राजन खाडे, सूरज मलकुमावत, प्रदीप भालेराव, सुभाष खंडारे, प्रशांत चौहान, चेतन तावरे, बापू गायकवाड, धर्मा बोंगाने, हितेश सुगंधी, अनिल मुनोत (पार्टनर, सॅफ्रॉन ग्रुप), महेश लाभशेटवार (पार्टनर, सॅफ्रॉन ग्रुप), राहुल पटेल, मयूर पटेल, दीपक पटेल, योगेश मोटे, नरेंद्र पटेल, हिंमत पटेल, गौरवकुमार, (खाली बसलेले, डावीकडून) हरिश वाघमारे, शेख शहनवाज, यादव गजलवार, दर्शिक पटेल.



**नुक्कड दी ईट स्ट्रीट थीम कॅफे केक बुटीक...**(डावीकडून) प्रियंका गाडे, महेश राठोड, संजय झोड, राजू जाधव, पवन जाधव, राजू धनराज, विशाल देशमुख, स्मिता कुलकर्णी.

अधिक माहितीसाठी ०२४०-३०२१७०८ या क्रमांकावर संपर्क साधावा. या महामॅरेथॉनमध्ये नोंदणी ऑनलाइनच करता येईल. त्यासाठी धावपटूंनी **www.mahamarathon.com** या संकेतस्थळावर नोंदणी करावी.

**स्पर्धा**

- Half Marathon - 21 Kms
- Power Run - 10 Kms
- Fun Run - 5 Kms
- Family Run - 3 Kms

ANAND CONSTRUCTION SINCE 1996 | लाभ | AURACON INFRA | CORE CONSULTANTS | ZAMBAD BUILDERS & DEVELOPERS | PARK GROUP
T-Shirt Partner: SANDIP UNIVERSITY
Co-Sponsors: PRIDE CENTURY | First Idea Education | SARA INSPIRED BY YOU
In Association with: WOCKHARDT | LiFE WiNS | Varroc EXCELLENCE
Food & Beverage Partner: Frut-X Fortune Foods
Official Energy Drink Partner: Enerzal
Sporting Accommodation Partner: istay sporty making sports happen
Health & Drink Partner: Vedika Care n Cure
Outdoor Partner: abhishek advertising & marketing pvt. ltd.
Healthcare Partner: VIDEOCON SETH NANDLAL DHOOT HOSPITAL
Race Management: YOU TOO CAN RUN
Health & Fitness Partner: RELAX - ZEAL
Water Partner: COOLZY Love your life
Banking Partners: बँक ऑफ बडोदा Bank of Baroda AURANGABAD REGION | Bank of India Relationship beyond banking
Sound Partner: S.S.PRO Sound for Soul Professional | Northern Pro Lights
Mall Partner: PROZONE LIFE BEGINS HERE
Sports Partners

**कायमस्वरुपी तंत्रज्ञान : पुढच्या वर्षी हवामान खाते स्वत:चे विमान घेणार**

# कृत्रिम पावसाची परदेशात दखल

विकास राऊत । लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : मराठवाड्यात** जून ते सप्टेंबर २०१५ या काळात करण्यात आलेल्या कृत्रिम पावसाच्या प्रयोगाची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली आहे. जपानमध्ये झालेल्या एका परिषदेत त्या प्रयोगावर सादर करण्यात आलेला रिसर्च पेपर (शोधनिबंध) प्रकाशित झाला आहे. त्या प्रयोगानंतर हवामान खाते पुढच्या वर्षी कृत्रिम पावसासाठी स्वत:चे विमान खरेदी करणार आहे. ते कायमस्वरुपी तंत्रज्ञान राज्यभरात दुष्काळी भागात कृत्रिम पावसाच्या प्रयोगासाठी वापरण्यात येणार आहे.

रडारच्या साहाय्याने तयार करण्यात आलेला डाटा हवामान खात्याला देण्यात आला आहे. त्याचे विश्लेषण करण्यात आल्यानंतर विमान खरेदी करण्याबाबत निर्णय झाला आहे. पुढच्या वर्षी त्याचा फायदा होईल. जून २०१८ मध्ये कृत्रिम पावसाच्या प्रयोगासाठी शासनाची स्वत:ची यंत्रणा तयार असेल.

सी-बॅण्ड डॉप्लर रडार, विमान व इतर साम्रगी शासन खरेदी करण्याच्या तयारीत आहे. २७ कोटी रुपये खर्चातून हाती घेण्यात आलेला कृत्रिम पावसाचा प्रयोग १४ दिवस करण्यात आला होता.

१०० तासांवर १०० तास मोफत असा करार ख्याती वेदर मॉडिफिकेशन या कंपनीसोबत करण्यात आला होता.

११० तासांच्या आसपास विमानाने प्रयोग करुन ९५० मि.मी.पर्यंत पाऊस पाडल्याचा दावा प्रशासनाने केला होता. कराराच्या ५० टक्केच उड्डाण झाले होते, तरीही १३ कोटी ५० लाख रुपयांचा जास्तीचा खर्च कंपनीला द्यावा लागला होता. २७ कोटींमध्ये ९० दिवस क्लाऊड सीडिंगचा प्रयोग करण्याचे कंत्राट देण्यात आले होते. विमान पार्किंग, शास्त्रज्ञ, पायलटस्, तंत्रज्ञांचे आवास, निवास खर्चासह ते कंत्राट होते. ४ ऑगस्ट रोजी प्रयोगाला सुरुवात झाली होती.


**फ्लेअर्स गेले कुठे...**

२०१५ ऑगस्टमध्ये ३४८, सप्टेंबरमध्ये २०१ असे ५४९ फ्लेअर्स ढगांमध्ये सोडण्यात आले होते. ३ हजार फ्लेअर्सचा साठा करुन ठेवण्यात आला होता. विमान गेल्यानंतर चिकलठाणा विमानतळावरील तो साठा कुठे गेला, याबाबत नायब तहसीलदार बी.डी. म्हस्के यांना विचारले असता ते म्हणाले, याबाबत आपल्याला काहीही माहिती नाही.

तत्कालीन आपत्तीव्यवस्थापन संचालक तथा भंडारा जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांना याबाबत विचारले असता ते म्हणाले, फोडून शिल्लक राहिलेले फ्लेअर्स विमानासोबतच नेण्यात आले. त्यामुळे त्यांचा साठा शिल्लक राहिला नाही.

### जपानच्या परिषदेत शोधनिबंध

जपानच्या एका परिषदेत तत्कालीन आपत्तीसंचालक सुहास दिवसे यांनी शोधनिबंध सादर केला. तो निबंध प्रकाशित झाला आहे. दिवसे यांनी 'लोकमत'ला सांगितले, 'आंतरराष्ट्रीय स्तरावर कृत्रिम पावसाबाबत मोठ्या प्रमाणात संशोधन सुरु आहे. चीनने या प्रयोगात मोठे यश मिळविले आहे. राज्य शासन पुढच्या वर्षात कृत्रिम पावसाची पूर्ण यंत्रणा खरेदी करण्याच्या तयारीत आहे.'



# 'गॅस्ट्रो'च्या चौकशीचे गांभीर्यच नाही

**दोषींना अभय : चौकशीचा झाला सोपस्कार**

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : छावणी** परिसरात तब्बल सहा हजारांवर नागरिकांना गॅस्ट्रोची लागण झाल्याची चौकशी पूर्ण करण्याचे समितीला गांभीर्यच नसल्याचे दिसते. दोषींना अभय देण्यासाठी कासवगतीने केवळ चौकशीचा सोपस्कार पार पाडला जात आहे.

छावणी परिसरात प्रारंभी ११ नोव्हेंबर रोजी २५० पेक्षा अधिक नागरिकांना गॅस्ट्रोची लागण झाल्याचे समोर आल्याने एकच खळबळ उडाली. रुग्णांची संख्या अवघ्या काही दिवसांत सहा हजारांवर पोहोचली. छावणी सामान्य रुग्णालयात तब्बल १२ दिवस गॅस्ट्रोच्या रुग्णांचा ओघ सुरु होता. त्यामुळे आरोग्य यंत्रणाच हादरून गेली. अनेक विभागांतील आरोग्य अधिकाऱ्यांनी छावणीत धाव घेतली. छावणीत एक लाइन लष्करी भागात, तर दुसरी लाइन नागरी वसाहतींसाठी आहे. एका नाल्यातून जलवाहिनी टाकण्यात आली आहे. या जलवाहिनीला कोणतीही उंची देण्यात आलेली नाही. दोन दिवस ही लाइन बंद होती. याचदरम्यान लिकेजमधून दूषित पाणी आत गेले आणि छावणी भागातील शेकडो नागरिकांना ड्रेनेजच्या दूषित पाण्यामुळे गॅस्ट्रो झाल्याचे समोर आले. 'एनआयव्ही'च्या अहवालामुळे गॅस्ट्रोची लागण पाण्यातील बॅक्टेरियामुळेच झाल्यावर शिक्कामोर्तब झाला.

याप्रकरणी छावणी परिषदेचे उपाध्यक्ष संजय गारोल यांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती नेमण्यात आली आहे. पाच सदस्यांच्या या समितीकडून चौकशी केली जात आहे. कोणाचा हलगर्जीपणा झाला, गॅस्ट्रोच्या उद्रेकाला कोण जबाबदार आहे, त्याचा शोध घेतला जात आहे. गॅस्ट्रोच्या उद्रेकास २५ दिवस उलटत आहे; परंतु यास जबाबदार असलेल्यांवर कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. चौकशी समितीकडून नुसता चौकशीचा फेरा सुरु आहे. त्यामुळे दोषींना अभय मिळत आहे.


आरोग्य यंत्रणा हादरली : दुसऱ्या दिवशीही रुग्णांच्या रांगा, लष्कर, घाटी रुग्णा...
छावणीत गॅस्ट्रोच्या रुग्णांची...

समितीकडून चौकशी केली जात आहे. काही ठिकाणांना भेट देण्यात आली आहे. तसेच कर्मचाऱ्यांचीही चौकशी केली आहे. समितीच्या बैठकीत गॅस्ट्रोची लागण होण्यास कोण जबाबदार आहे, हे निश्चित केले जाणार आहे.

-संजय गारोल,
उपाध्यक्ष, छावणी परिषद

## पथदिवे त्वरित सुरु करण्याचे आदेश

**औरंगाबाद : शहरात** ४० हजार पथदिवे असून, त्यातील ४० टक्के पथदिवे बंदच आहेत. पथदिव्यांचे काम पाहणाऱ्या कंत्राटदारांकडून काम करुन घ्यावे, अधिकाऱ्यांनी कामाचे वाटप करुन घ्यावे, असे आदेश सभागृहनेता विकास जैन यांनी मंगळवारी दिले. विद्युत विभागाच्या बैठकीत त्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. बंद पथदिव्यांमुळे नागरिकांना त्रास होतोय. यावेळी सेना नगरसेवक उपस्थित होते.

**₹ वाणिज्य वार्ता**

## शेअर बाजार गुंतवणुकीवरील मोफत कार्यशाळेचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : सामान्य** गुंतवणूकदारांना शेअर बाजाराची प्राथमिक माहिती मिळावी, यासाठी निफ्टी पोझिशन सर्व्हिसेस या पुण्यातील संस्थेच्या वतीने शनिवार, ९ डिसेंबर रोजी मोफत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

समर्थनगर येथील वरद गणेश मंदिरासमोरील हॉटेल कार्तिकी येथे दोन सत्रांत कार्यशाळा होणार आहे. सकाळी ११ ते दुपारी २ व सायंकाळी ६ ते ९ वाजेदरम्यान कार्यशाळा होईल. टेक्निकल ॲनालिस्ट योगेश लाटणेकर व त्यांचे सहकारी मार्गदर्शन करणार आहेत. उपस्थित गुंतवणूकदारांना निफ्टी फ्युचर्स व ऑप्शनच्या मोफत ट्रायल टिप्स देण्यात येणार आहेत. याचा लाभ गुंतवणूकदार इच्छुकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



डॉ. प्रतिभा श्रीपत यांना पुरस्कार प्रदान करताना उपजिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, तसेच व्यासपीठावर उपस्थित डॉ. प्रकाश पारखे, एस. पी. जवळकर, विष्णू सुरासे, सरोज पारखे, डॉ. सी. एस. पाटील.

## रस्त्याचे भूमिपूजन

**औरंगाबाद : चिकलठाणा** येथील फुलमाळी गल्लीत नगरसेविका ज्योती सुनील नाडे यांच्या प्रयत्नातून १२ लाख रुपयांच्या सिमेंट रस्त्याच्या कामाचे उद्घाटन भाजपचे उपाध्यक्ष मदनकाका नवपुते यांच्या हस्ते करण्यात आले.

Govt Reg.No.7342
पेन केअर इंस्टीट्युट
ऑर्थोपेडीक सर्जन द्वारे सल्ला व उपचार
सांधेवात, गुडघेदुखी, मान, पाठ,कंबरदुखी मायग्रेन (डोकेदुखी),फ्रोझन शोल्डर (खांदेदुखी) सायटीका, स्लिप डिस्क, टाचदुखी, टेनिस ऐल्बो हातापायात मुंग्या येणे आता अत्याधूनिक विना दुष्परिणाम बोटॉक्स इंजेक्शन उपचारा द्वारा वेदनेपासुन मुक्ती मिळवून आपण गुढघ्याचे व पाठीचे ऑपरेशन काही काळास्तव टाळू शकता.
अपना बाजार, बाफना ज्वेलर्स समोर, जालना रोड, औरंगाबाद.
9822899660, 9422713387, 9767442040
( कृपया अपॉईंटमेंट घेऊनच येणे )
सोमवार ते शुक्रवार फक्त

केस पातळ केस गळतीवर उपचार
तेलकट चेहरा, मुरुम पिंपल्स, खरबडीत चेहरा, काळे डाग सुर्यप्रकाशामुळे निस्तेज चेहरा
ग्लॉयकोलीक पिलींग थेरेपी
फी २००/- उपचार खर्च प्रति महा ९००/-



MAXIMA
HAIR & SKIN CLINIC
पहिला मजला, तापडिया सिटी सेंटर, निराला बाजार, औरंगाबाद.
वेळ - ११ ते ५ (रविवार बंद)
मो. 7757941206

आता प्रथमच सेक्स समस्यांवर अत्याधुनिक विदेशात प्रचलित लेझर व व्हॅक्युम थेरेपी उपचार
विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी एम.बी.बी.,एस.एम.डी. डॉक्टरांचा सल्ला
हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, इंद्रीय शिथिलता, पुरुष वंधत्व
हायपोगोनॅडिझममुळे इंद्रीय समस्या, मधुमेहामुळे आलेली लैगिंक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या कमी असणे. ॲझुस्पर्मीया: शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.
आशाकिरण क्लिनीक
१९८५ पासुन शास्त्रीयोक्त मार्गदर्शन केंद्र
३८, निराला बाजार, बाटा शोरुम समोर, औरंगाबाद. वेळ - स.११ ते ३ व सायं.७ ते ९ शनिवार रविवार बंद
कृपया अनावश्यक खर्चीक व फसव्या उपचारापासुन सावध मो. 7769856821 9767132521



# ममत्व म्हणजे केवळ माया नव्हे

**वर्षा ठाकूर : आदर्श माता पुरस्काराचे वितरण**

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : ममत्त्व** म्हणजे फक्त डोक्यावरुन हात फिरवणे, माया करणे एवढेच नसते. बालकाच्या कल्याणासाठी आईचे ममत्व प्रसंगी कठोरही बनते. आई ही प्रत्येक व्यवस्थापनाचे विद्यापीठच आहे. आपल्या आईकडून व्यवस्थापनाचे धडे शिकलात तर कोणत्याही महाविद्यालयात जाऊन ते नव्याने शिकण्याची गरज पडणार नाही, अशा शब्दांत उपजिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांनी आईची महती स्पष्ट केली.

मातोश्री माईसाहेब पारखे मेमोरिअल ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने बुधवारी सायंकाळी आदर्श माता पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. देवगिरी महाविद्यालयात झालेल्या या कार्यक्रमात वर्षा ठाकूर यांच्या हस्ते सृष्टी फाऊंडेशनच्या माध्यमातून पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जालना येथील डॉ. प्रतिभा श्रीपत यांना 'आदर्श माता' पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी ठाकूर यांनी उपस्थितांशी संवाद साधला. देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य शिवाजी थोरे, उपप्राचार्य डॉ. अशोक तेजनकर, डॉ. सी. एस. पाटील, एस. पी. जवळकर, ट्रस्टचे डॉ. प्रकाश पारखे, सरोज पारखे, हास्यकवी विष्णू सुरासे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. डॉ. श्रीपत यांनी जालना येथे रोटी बँकेचीही सुरुवात केली आहे. हा पुरस्कार एकटीचा आणि एका दिवसाचा नसून यासाठी अनेक हात अनेक वर्षांपासून झटत आहेत, अशा शब्दांत त्यांनी मनोगत व्यक्त केले. जवळकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. पारखे यांनी प्रास्ताविकातून ट्रस्टच्या कार्याविषयी माहिती दिली. द्वारकानाथ जोशी यांनी संचालन केले. स्मिता मांडे यांनी स्वागतगीत आणि मातृवंदना सादर केली. विनायक पारखे, अमर चौधरी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

ट्रस्टच्या वतीने मागील ४१ वर्षांपासून हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. यामध्ये सुरुवातीला आपल्या बालकाला उत्तमरीत्या घडविणाऱ्या आईला हा पुरस्कार दिला जायचा. आता पुरस्काराचे स्वरुप अधिक व्यापक झाले असून, अनेकांसाठी आधार बनलेल्या मातास्वरुप व्यक्तिमत्त्वाला हा पुरस्कार दिला जातो.



#MahaMarathon /MahaMarathon | लोकमत
Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
17 Dec 2017
Associate Sponsor riso Ricebran Oil
Powered by DHOOT TRANSMISSION
१७ डिसेंबर २०१७
विभागीय क्रीडा संकुल, सूतगिरणी चौक, गारखेडा, औरंगाबाद
नावनोंदणी www.mahamarathon.com/aurangabad वर ऑनलाईन करु शकता किंवा मॅरेथॉनची प्रवेशिका लोकमत भवन, जालना रोड येथे उपलब्ध । संपर्क : 9130239424 । फोन : 0240-3021708
ANAND CONSTRUCTION | लाभ | AURACON INFRA | CORE CONSULTANTS | ZAMBAD BUILDERS & DEVELOPERS | PARK GROUP
T-Shirt Partner: SANDIP UNIVERSITY
Co-Sponsors: PRIDE CENTURY | First Idea Education | SARA INSPIRED BY YOU
In Association with: WOCKHARDT | LiFE WiNS | Varroc EXCELLENCE
Food & Beverage Partner: Frut-X Fortune Foods
Official Energy Drink Partner: Enerzal
Sporting Accommodation Partner: istay sporty making sports happen
Health & Drink Partner: Vedika Care n Cure
Outdoor Partner: abhishek advertising & marketing pvt. ltd.
Healthcare Partner: VIDEOCON SETH NANDLAL DHOOT HOSPITAL
Race Management: YOU TOO CAN RUN
Health & Fitness Partner: RELAX - ZEAL
Water Partner: COOLZY
Banking Partners: बँक ऑफ बडोदा Bank of Baroda AURANGABAD REGION | Bank of India
Sound Partner: S.S.PRO | Northern Pro Lights
Mall Partner: PROZONE
Sports Partners